# <u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>

## <u>जाहीर सूचना</u>

सार्वजनिक उद्‌दिष्टांसाठी राखीव असलेल्या महानगरपालिकेच्या जागेवरील समाजकल्याण केद्रांकरिता आरक्षित असलेल्या इमारती अनुज्ञा व अनुज्ञप्ती तत्त्वावर परिरक्षण व व्यवस्थापना करिता सार्वजनिक संस्थांना वाटप करण्यासंबंधीच्या धोरणास सुधार समिती ठराव क्र.१७२ दि.२०.०२.२०२० व महानगरपालिका ठराव क्र.१५९ दि.२४.११.२०२० अन्वये मंजूरी प्राप्त झालेली आहे. सदर धोरणाच्या आधारे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीची चिल्ड्रन थियेटर करिता आरक्षित आरक्षित असलेली बांधीव सुविधा "चित्रपट प्रदर्शन, मास्टर क्लासेस,चित्रपट प्रशंसा कार्यशाळा,बूट शिबीरे, मुलांसाठी आणि प्रौढांसाठी विशेष कार्यक्रम व बालरंगभूमी" या उद्‌देशांकरिता कार्य करणा-या पात्र संस्थेस वितरित करावयाचे असुन सदर क्षेत्रात प्रत्यक्ष कार्य करणा-या संस्थांनी अर्ज सादर करावेत.

| **जागेचा तपशील** | **बांधीव सुविधेचा तपशील** |
|---|---|
| न.भू. क्र. ११६६ ते ११६९ आणि ११७९, शेरली राजन व्हिलेज येथील चिल्ड्रन थियेटर करिता आरक्षित असलेली बांधीव सुविधा | क्षेत्रफळ - अंदाजे ७१२.६३ चौ.मी. |

१) अर्ज करणारी संस्था धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयात संस्था नोंदणी अधिनियम त्याचप्रमाणे मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० या दोन्ही अधिनियमानुसार मागील ५ वर्षापासून (अर्ज मागविण्याच्या दिनांकापूर्वी) नोंदणीकृत असावी अथवा कंपनी कायद्या नुसार सदर कंपनी नोंदणीकृत असावी.

२) चिल्ड्रेंन थियेटर करिता आरक्षित असलेल्या बांधीव सुविधेचे वाटप "चित्रपट प्रदर्शन, मास्टर क्लासेस,चित्रपट प्रशंसा कार्यशाळा,बूट शिबीरे, मुलांसाठी आणि प्रौढांसाठी विशेष कार्यक्रम व बालरंगभूमी" म्हणून करण्यात येणार असल्याने अर्जदार संस्थेकडे सदर क्षेत्रातील कमीत कमी ०३ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे व त्यासंदर्भात कागदोपत्री पुरावे अर्जासोबत सादर करणे.

३) संस्थेची मागील तीन वर्षाच्या कालावधीतील किमान वार्षिक उलाढाल रुपये दहा लाख असावी. तथापि सदर उलाढाल संस्थेच्या पुढील आर्थिक वर्षाच्या प्रस्तावित

खर्चाच्या ५०% पेक्षा कमी नसावी. मागील तीन वर्षांच्या कालावधीकरिता सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेला ताळेबंद अर्जासोबत सादर करावा लागेल.

४) संस्थेच्या नावे स्वतंत्र पॅन क्रमांक (आयकराचा स्थायी खाते क्रमांक) असावा.

५) संस्था आयकर प्रपत्र सादर करणारी / करदाती असावी आणि मागील ३ वर्षाचे आयकर विवरणपत्र सादर करण्यात यावे.

६) अर्जासोबत इसारा रक्कम रु.१५,०००/- रोखीत अथवा B.M.C. च्या नावे पे ऑर्डर / डिमांड ड्राफ्ट च्या स्वरूपात भरणा करण्यात यावी.

७) संस्थेचे सादरीकरण करीता गुणांकन असल्याने निवडीच्या वेळी संस्थेचे कार्य व इतर तपशिलासंदर्भात सर्वसमावेशक सादरीकरण करणे आवश्यक.

८) पात्र संस्थेस प्रथमतः ११ महिन्यांकरिता अनुज्ञा व अनुमती तत्वावर रु ५/- प्रति चौ. फूट प्रति महिना या दराने अनुज्ञप्ती शुल्काचा भरणा करावा लागेल.

९) पात्र संस्थेस दोन वर्षाच्या अनुज्ञप्ती शुल्काइतकी रक्कम व्याज विरहीत सुरक्षा ठेव म्हणुन महानगरपालिकेकडे जमा करावी लागेल.

**चिल्ड्रन थियेटर करिता आरक्षित असलेल्या बांधीव सुविधेचे वाटप "चित्रपट प्रदर्शन, मास्टर क्लासेस,चित्रपट प्रशंसा कार्यशाळा,बूट शिबीरे, मुलांसाठी आणि प्रौढांसाठी विशेष कार्यक्रम व बालरंगभूमी" या उद्दिष्टपुर्तीकरिता करण्यात येत असल्याने निवडीदरम्यान मुल्यमापन करतांना खालील बाबींचाही प्राधान्याने विचार केला जाणार असल्याने संस्थांनी खालील बाबी संदर्भातील कागदोपत्री पुरावे अर्जासोबत सादर करावे.**

१) संस्था आंतरराष्ट्रीय स्तरावर मराठी भाषिक चित्रपट / बालरंगभूमी इ. करिता कार्य करित असल्यास.

२) संस्था विभाग, परिमंडळ, मुंबई शहर व उपनगरे क्षेत्रात कार्य करित असल्यास.

३) संस्थेकडे उपरोक्त नमुद उपक्रम राबविण्याकरिता पुरेसा प्रशिक्षित कर्मचारी वर्ग असल्याबाबतचा तपशिल अर्जासोबत सादर करणे आवश्यक.

४) चित्रपट/अभिनय/बालरंगभूमी या क्षेत्रामधील राबविलेल्या कार्यक्रमांचा तपशिल सादर करावा.

५) संस्थेस प्राप्त गुणगौरव/प्रमाणपत्रे/ पारितोषिके यासंदर्भातील कागदोपत्री पुरावे.

६) संस्थेतर्फे राबविण्यात येणा-या उपक्रमांचा तपशिल व त्याचे लाभार्थी इ. कार्याबाबतचा तपशिल असल्यास सादरीकरणामध्ये सदर बाबीचा अंतर्भाव करावा.

७) संस्थेकडून प्रशिक्षित करण्यात आलेल्या लाभार्थ्यांनी विविध क्षेत्रातील नैपुण्य/कौशल्य प्राप्त केल्यासदंर्भातील कागदपत्रे.

सुलभ संदर्भाकरिता समाजकल्याण केंद्रांच्या वाटपाच्या धोरणाची प्रत महानगरपालिकेच्या https://portal.mcgm.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

"चिल्ड्रेंन थियेटर" करिता आरक्षित असलेल्या बांधीव सुविधेचे वाटप करताना "चित्रपट प्रदर्शन, मास्टर क्लासेस,चित्रपट प्रशंसा कार्यशाळा,बूट शिबीरे, मुलांसाठी आणि प्रौढांसाठी विशेष कार्यक्रम व बालरंगभुमी" हे उद्दिष्ट साध्य करावयाचे असल्याने या क्षेत्रात कार्य करणा-या संस्थांनी समाजकल्याण केंद्र वाटपाच्या मंजुर धोरणातील पात्रतेच्या निकषानुसार लेखी स्वरुपात आवश्यक कागदपत्रांसह आपले अर्ज दि. २६.०९.२०२३ पर्यंत दुपारी ०३.०० वाजेपर्यंत सहाय्यक आयुक्त (मालमत्ता) यांच्या कार्यालयामध्ये सादर करावेत. विहीत मुदती नंतर सादर केल्या जाणा-या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

सहाय्यक आयुक्त (मालमत्ता) यांचे कार्यालय
बृहन्मुंबई महानगरपालिका (मुख्य कार्यालय),
विस्तारित इमारत, ४था मजला,
फोर्ट, मुंबई -४००००१

सही/-

**सहाय्यक आयुक्त (मालमत्ता)**